# कृषि संशोधन केंद्र, आवाशी, ता.खेड, जि.रत्नागिरी
(डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली)

दुरध्वनी (०२३५६) २७२०१२ E –mail: scrs.awashi@rediffmail.com


जा.क्र. कृसंके/आस्था/प्रस/ /२०१८ दिनांक :

## जाहिरात

या विद्यापीठांतर्गत कार्यान्वित असलेल्या **फळ पिके आणि शोभिवंत झाडांची रोपवाटीका परीभ्रमण निधी** योजनेमध्ये निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात खाली दिलेल्या तपशिलाप्रमाणे पद भरण्यासाठी सोबत जोडलेल्या नमुन्यात शैक्षणिक प्रमाणपत्राच्या सत्यप्रतीसह पात्र उमेदवारांकडून दिनांक २९/०१/२०१८ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदाचे नाव | पदांची संख्या | एकत्रित वेतन प्रती महिना (रू.) | नेमणुकीचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | प्रक्षेत्र सहाय्यक | १ | ८,०००/- | दिनांक ३१/०३/२०१८ पर्यंत |

**पात्रता :-**

| अ. क्र. | पदाचे नांव | आवश्यक पात्रता |
|---|---|---|
| १. | प्रक्षेत्र सहाय्यक | कृषि पदविका, MSCIT प्रक्षेत्रावरील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य |

**नियम व अटी :**

१. वयाची मर्यादा :- अर्जदाराचे वय ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. (अनुसुचित जाती/जमातीच्या अर्जदारांना नियमानुसार वयाच्या मर्यादेमध्ये सवलत दिली जाईल).
२. अर्जदाराने सोबत दिलेल्या नमुन्यामध्ये माहिती भरून **प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र, आवाशी, पो. आवाशी, ता. खेड, जि. रत्नागिरी पीन कोड - ४१५७२२** यांचे कार्यालयात **दिनांक २९/०१/२०१८** पुर्वी पोहोचतील अशाप्रकारे पाठविण्यात यावेत. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.
३. अर्जाच्या लखोटयावर कोणत्या पदासाठी अर्ज केला आहे याचा ठळक उल्लेख करावा.
४. पात्र उमेदवारांच्या निवड समितीव्दारे मुलाखती/प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात येतील.
५. मुलाखीला येताना अर्जाला जोडण्यात आलेल्या सर्व प्रमाणपत्रांच्या मुळ प्रती सोबत आणाव्या लागतील.
६. मुलाखतीला बोलविण्यात आलेल्या उमेदवारांना प्रवास तसेच दैनिक भत्ता अनुज्ञेय असणार नाही.
७. निवड झालेल्या उमेदवाराला रू. १००/- किमतीच्या बॉंड पेपरवर नियुक्त केलेल्या कालावधीत नोकरी सोडून जाता येणार नाही असे लिहून दयावे लागेल.
८. निवड झालेल्या उमेदवाराला अकरा महिने किंवा प्रकल्पाच्या कालावधीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती देण्यात येईल.
९. नियुक्त केलेल्या उमेदवाराच्या कामाचे प्रकल्प प्रमुख यांचे मार्फत मुल्यमापन करण्यात येईल. सदर उमेदवाराचे काम असमाधानकारक आढळल्यास करण्यात आलेली नियुक्ती दिलेल्या कालावधीच्या आधि समाप्त करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना राहतील.
१०. निवड झालेल्या उमेदवार डॉ. बा. सा. कोकण कृषि विद्यापीठ, दापोली या कार्यालयात कायमस्वरूपी नोकरी मिळण्यासाठी कोणताही हक्क राहणार नाही.
११. उमेदवाराला नोकरी सोडावयाची असल्यास त्याने तसे एक महिना आधि लेखी कळविण्यात यावे. तसे न केल्यास त्याचा एक महिन्याचा पगार कापून घेण्यात येईल.
१२. निम्नस्वाक्षरीकार यांना प्राप्त अर्ज/सर्व अर्ज कोणतेही कारण न दाखविता नाकारण्याचे हक्क आहेत.
१३. उमेदवाराला देण्यात आलेली तात्पुरत्या स्वरूपातील नियुक्ती वेतन प्रकल्प संपल्यानंतर आपोआपच रद्द होतील.

प्रभारी अधिकारी
कृषि संशोधन केंद्र,आवाशी

प्रत माहिती व प्रसिध्दीसाठी.........................